**नगर रचना आणि मुल्यनिर्धारण विभाग,**
**शाखा औरंगाबाद.**

जा.क्र. बांधकाम परवानगी/मौ. सावंगी/ता. गंगापूर/गं.५७ पै./ससंऔ/२८०९ — औरंगाबाद.
दि: १८/०२/२०२०

प्रति,

मा. जिल्हाधिकारी,
औरंगाबाद

**विषय :- निवासी प्रयोजनार्थ बांधकाम परवानगी मिळणे बाबत.**
मौ.सावंगी ता. गंगापूर जि. औरंगाबाद ग.न. ५७ पै., भूखंड क्र. २/६५
चे क्षेत्र ५०१.१२ चौ.मी. व २/७० चे क्षेत्र ५४२.३२ चौ.मी. क्षेत्रावर निवासी बांधकाम परवानगी बाबत.
अर्जदार: सौ.मनोरमा प्रमोद काबरा व इतर

**संदर्भ** :- मा. जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचे पत्र क्र. २०१९/मशाका/जमीन-१/एनएपी-३४प्र.क्र.- , दि. २६.१२.२०१९

महोदय,

संदर्भित पत्रान्वये मौ.सावंगी ता. गंगापूर जि. औरंगाबाद ग.न. ५७ पै., भूखंड क्र. २/६५ चे क्षेत्र ५०१.१५ चौ.मी. व २/७० चे क्षेत्र ५४२.३२ मधील मंजूर रेखांकनातील भूखंडावर निवासी बांधकाम क्षेत्र ६१८.४५ व ६७३.८० चौ.मी. बांधकाम परवानगीचा प्रस्ताव प्राप्त आहे.

या कार्यालयाने मौजे सावंगी ता. गंगापूर जि.औरंगाबाद येथील ग.नं. ५७ पैकी मधील अभिन्यासास या कार्यालयाने पत्र क्र. ६८६, दिनांक ०२.०४.२०१९ अन्वये **निवासी** वापरासाठी अंतिम मंजूरीची शिफारस केलेली आहे. सदर अभिन्यासास उपविभागीय अधिकारी, वैजापूर यांनी आदेश क्र. २०१८/उविअवै/अकृषीक/मौजे सावंगी ता.गंगापूर/प्र.क्र.३३ दि.३०.०८.२०१८ अन्वये **निवासी** प्रयोजनार्थ अकृषिक आदेश दिलेले आहे. तसेच या कार्यालयाने पत्र क्र. १७१, दि. ३०.०१.२०२० अन्वये भूखंड क्र. २/६५ व २/७० या भूखंडाचे एकत्रिकरणास तत्वतः मंजूरीची शिफारस केलेली आहे.

संदर्भिय पत्रान्वये या कार्यालयास बांधकाम परवानगी प्रस्ताव प्राप्त झाला असता, सदरहू नकाशांची मंजुर विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील नुसार छाननी केली असता बांधकाम नकाशे विकास नियंत्रण नियमावलीनुसार सर्वसाधारणपणे योग्य असल्याने खालील अटी व शर्तीस अधिन राहून निवासी प्रयोजनासाठी बांधकाम परवानगीची शिफारस करण्यात येत आहे.

**अटी व शर्ती :-**

१) सदर मंजूरी प्रथम एक वर्षा करीता वैध राहील.
२) या कार्यालयाने विषयांकित प्रकरणी पत्र क्र. ६८६, दिनांक ०२.०४.२०१९ अन्वये अभिन्यास अंतिम मंजूरीची शिफारस करतांना नमूद केलेल्या सर्व अटी व शर्तीचे पालन करणे अर्जदारावर बधनकारक राहील.
३) उपविभागीय अधिकारी, वैजापूर यांनी आदेश क्र. २०१८/उविअवै/अकृषीक/मौजे सावंगी ता.गंगापूर/प्र.क्र.३३ दि.३०.०८.२०१८ अन्वये दिलेल्या अकृषि आदेशाचे अटी व शर्ती कायम असून त्याचे पालन करणे अर्जदारावर बंधनकारक राहील. तसेच पत्र क्र. क्र. १७१, दि. ३०.०१.२०२०अन्वये एकत्रिकरणातील अटी व शर्तीचे पालन करणे बंधनकारक राहील.
४) प्रकरणी वास्तुविशारद यांनी सादर केलेले नकाशाच्या आधारे उक्त शिफारस करण्यात येत असून प्रत्यक्षात या व्यतिरिक्त बांधकाम झाल्यास त्यास संबधीत अर्जदार/जमीन मालक/विकासक/वास्तुशिल्पकार जबाबदार राहील.
५) बांधकामाच्या ठिकाणी डिसप्ले बोर्ड लावणे व त्यावर खालील प्रमाणे तपशिल नमूद करणे आवश्यक राहील.
   अ) जागा मालकाचे /डेव्हलपर्सची/वास्तुविशारद/कॉन्ट्रक्टरची नांवे व पत्ते.
   ब) स.न. / सिसन/ ग.न. इत्यादी भूखंडाचा तपशिल
   क) बांधकाम परवानगी क्रमांक व दिनाक
   ड) अनुज्ञेय करण्यात आलेले बांधीव क्षेत्र
   ई) मंजूर नकाशाची प्रत ज्या ठिकाणी पहावयास मिळेल त्या ठिकाणचा / कार्यालयाचा नांव व पत्ता
६) भूकंप विरोधक व्यवस्था अर्जदाराने करणे बंधनकारक राहील.
७) वरील जागेचा व नियोजीत इमारतीचा वापर निवासी वापरासाठी करण्यात यावा व बांधकाम मंजूर नकाशा प्रमाणे असावे
८) स्थलदर्शक नकाशावर दर्शविल्याप्रमाणे नियोजित बांधकामापासून पुढील, मागील व बाजूची अंतरे प्रत्यक्षात जागेवर असली पाहिजेत व त्याखालील जागा कायम खुली ठेवावी ही सर्वस्वी जबाबदारी वास्तुविशारद यांची राहील.
९) नियोजीत बांधकामाचे भूखंडातील अस्तित्वातील अन्य बांधकाम धरुन एकुण क्षेत्र सुविधा क्षेत्र व प्रादेशिक योजना रस्ते / रस्ता रुंदी क्षेत्र वगळता उर्वरित निव्वळ क्षेत्राच्या क्षेत्राच्या नकाशावर दर्शविले इतके प्रत्यक्ष जागेवर कमाल राहीले पाहीजे.
१०) नियोजीत इमारती मध्ये १/१० रुमच्या क्षेत्रा इतके वायुविजन उपलब्ध होणे आवश्यक राहील.

११) नियोजित इमारतीसाठी / विकासासाठी आवश्यक असणा-या पाण्याची सोय व सांडपाण्याची व मैला निर्मुलनाची व्यवस्था नसल्यास, प्रत्यक्ष वापरापूर्वी अर्जदाराने केली पाहीजे.

१२) नियोजित बांधकामात मंजूरीपेक्षा वेगळे बदल करावयाचे असल्यास किंवा वापर बदलावयाचा असल्यास महसुल विभागाची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

१३) जागेच्या हद्दी, क्षेत्र व मालकी हक्काची छाननी, याबाबत खात्री महसूल विभागाने करणे आवश्यक राहील.

१४) नियोजित बांधकामामुळे भूखंडावर असलेल्या कोणाच्याही वहीवाटीचे हक्काचा भंग होणार नाही याची जबाबदारी अर्जदार/मालकाने घेतली पाहीजे.

१५) बांधकाम करतांना Structrual Safety व Quality Controll ( गुणनियंत्रण ) संबधी अनुषंगीक नियमांचे पालन करणे बंधनकारक राहील.इमारतीचे आर सी सी डिझाईन स्ट्रक्चरल इंजिनियर यांनी मंजूर करणे आवश्यक राहील.

१६) बांधकाम करते वेळी कामगाराचे सुरक्षेविषयी अवश्यक ती खबरदारी विकसकांनी घेणे बंधनकारक राहील. त्यावर वास्तुविशारद यांनी वैयक्तिक लक्ष दयावे.

१७) विषयांकित बांधकाम नकाशांची छाननी प्रस्तावासोबत उपलब्ध असणा-या कागदपत्रांच्या आधारे केलेली आहे. या कागदपत्रांच्या अधिकृततेबाबत व अद्यावत नोंदीबाबत महसूल विभागाने खात्री करावयाची असून त्यास हे कार्यालय कोणत्याही परिस्थितीत जबाबदार राहणार नाही.

१८) विषयांकित बांधकाम नकाशाची छाननी, अनुज्ञेय चटई क्षेत्र, भुव्याप्त क्षेत्र, मालकी हक्क इ. बाबत मालमत्ता धारक, वास्तुशिल्पकार जबाबदार राहतील. तसेच प्रस्तावातील बांधकामाचे क्षेत्र, चटई क्षेत्र व मंजूर विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील उलंघन याबाबत संबंधित वास्तुविशारद व अर्जदार जबाबदार राहतील.

१९) रेन वॉटर हार्वेस्टिंग बाबतची यंत्रणा अर्जदार यांनी इमारतीचे वापरापूर्वी स्वखर्चाने करावयाची आहे.

२०) सौर उर्जेवर पाणी तापविण्यासाठीची यंत्रणा अर्जदार यांनी इमारतीचे वापरापूर्वी स्वखर्चाने करावयाची आहे. तसेच शक्यतो सौर उर्जेवर रस्त्याच्या लगतचे पथदिवे बसविण्याचे आहेत.

२१) वेस्ट वॉटर ट्रीटमेंट प्लॅन्ट यंत्रणा स्वखर्चाने अर्जदार यांनी करावयाची आहे. व पाण्याचा फेर वापर बगीचा, झाडाची जोपासना यासाठी करणे आवश्यक आहे.

२२) प्रस्तुत प्रकरणातील जमीनीवर कोणतेही बांधकाम सुरु केल्यानंतर जोते तपासणी प्रमाणपत्र घेतल्याशिवाय पुढील बांधकाम करता येणार नाही व सदरचे बांधकाम पूर्ण झालेनंतर निवासी वापर सुरु करणेपूर्वी वर नमुद सर्व अटींची पूर्तता करुन भोगवटा प्रमाणपत्र घेणे. अर्जदारावर बंधनकारक राहील अन्यथा नियमानुसार कारवाईस पात्र राहील.

२३) अर्जदाराने सादर केलेली कोणतीही माहिती अथवा कागदपत्रे ही चुकीची / दिशाभूल करणारी आढळल्यास प्रस्तुतची शिफारस रद्द समजणेत येईल.

२४) महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना,अधिनियम १९६६ चे कलम-१२४ ए ते एल नुसार बांधकाम निधी शुल्क व अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक शुल्क शुल्क रु.१,३८,९००/- डिफेस चलन क्र. ०००६२५७२४३२०१९२० दि. १५.०२.२०२० अन्वये भरणा केलेला आहे.

२५) सदर प्रकरणी ८ रो हाऊसचे बांधकाम प्रस्तावित आहे. रेखांकनानुसार १० रो हाऊसचे बांधकाम प्रस्तावित होऊ शकते. त्यामुळे रो हाऊस प्लॉट क्र. २/६२ वर कोणतेही बांधकाम अनुज्ञेय होऊ शकणार नाही. त्यानुसार सिमांकन नकाशात याबाबत दुरुस्ती करणे आवश्यक राहील.

२६) सदर एकत्रिकरणाच्या अभिन्यासास तात्पुरती मंजूरीची शिफारस करण्यात आलेली आहे. बांधकाम पूर्णत्वाच्या अगोदर एकत्रिकरण अभिन्यासास अंतिम मंजूरीची परवानगी घेणे आवश्यक राहील.

उक्त प्रकरणी अर्जदार यांनी सादर केलेल्या नकाशांची या कार्यालयाने नगर रचनेच्या दृष्टीकोनातून केलेली छाननी केवळ बांधकाम नकाशे प्रचलित नियमावलीनुसार असलेल्या मर्यादेत असून वर नमुद व इतर सर्व अनुषंगिक मुद्याची छाननी व पूर्तता आपलेकडून करणेत येऊन मंजूरीबाबत पुढील जरुर ती कार्यवाही करणेत यावी.

प्रकरणासोबत बांधकाम नकाशाचा एक संच या कार्यालयाच्या अभिलेखार्थ ठेवून उर्वरीत दोन संच पुढील कार्यवाहीसाठी यासोबत सादर करण्यात येत आहे. उक्त प्रकरणी,आपणाकडून जरुर ती मंजूरी दिलेनंतर उक्त आदेशाची एक प्रत किंवा मंजूरी नाकारल्यास त्या पत्राची प्रत या कार्यालयाचे अभिलेखार्थ पाठवावी, ही विनंती.

आपला,

सोबत:- वरील प्रमाणे.

सहायक संचालक, नगर रचना,
औरंगाबाद.

प्रत: अर्जदार सौ.मनोरमा प्रमोद काबरा व इतर यांना माहितीस्तव.

Res. Building Permission/502/C2



AREA STATEMENT :
SCHEDULE OF OPENINGS :
LEGEND :
TITLE :
LAYOUT PLAN
C-8
C-7
C-6
C-5
C-4
C-3
C-2
C-1
12.00 M. WIDE ROAD
SITE PLAN
SCALE-1:200




# SITE PLAN

SCALE-1:200

OFFICE USE

**AREA STATEMENT :**

- PLOT HOLDER AREA
- F.S.I PERMISSIBLE AS PER PROPOSAL
- F.S.I. CONSUMED
- ROW AREA STATEMENT
- TOTAL BUILT UP AREA
- PAID PREMIUM PERMISSIBLE
- CONSUMED PAID PREMIUM

**SCHEDULE OF OPENINGS :**

DOORS / WINDOWS

**LEGEND :**

TITLE :

PROPOSED PLAN OF ROW-HOUSING SCHEME ON PLOT NO. 3/10, JOINT NO. 27, SITUATED AT VILLAGE - SHIWANGI, TQ GANGAPUR, DIST. AURANGABAD.

PIYUSH G. BHAVSAR

SCALE ARCHITECTS LAB

Ar. PIYUSH BHAVSAR